# डॉ. कतुरवार, डॉ.तीरकमटे यांचा उपमुख्यमंत्र्याच्या हस्ते सत्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर : येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन संशोधन केंद्राद्वारे स्वारातीम विद्यापीठात पि. एचडी. पदवी ३ वर्ष ८ महिण्यात पूर्ण केलेल्या डॉ.एन.एम. तीरकमटे व त्यांचे संशोधन मार्गदर्शक डॉ.बी.आर. कतुरवार यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे येथे २६ नोव्हेंबर रोज़ी सत्कार करण्यात येणार आहे. याप्रसंगी संशोधक विद्यार्थ्याला महाराष्ट्र शासनाच्या वतीने ५० हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

या यशाबद्दल लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार व विद्यार्थी डॉ.एन.एम. तीरकमटे यांचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ.कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार , गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा द्याडे. चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व प्राध्यापक आदींनी अभिनंदन केले.

Scanned with CamScanner